**महाराष्ट्र शासन**
**राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, महाराष्ट्र राज्य**
**नगर भवन, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१**
दूरध्वनी - (०२२) २२६११९९४
Website - www.dol.maharashtra.gov.in E mail- sclmumbai.dol@maharashtra.gov.in

जा.क्र.१५/फॅर्निचर व झेरॉक्स मशीन निर्लेखन/२०१८-१९/५५२६ दि. ०१/०१/२०१९

## जडसंग्रह वस्तूंच्या (फर्निचर व झेरॉक्स मशीन) लिलाव विक्रीची सूचना (दुसऱ्यांदा)

राज्य मध्यवर्ती ग्रंथालयातील जुने, निरुपयोगी व विना वापरातील जडसंग्रह वस्तूंची व झेरॉक्स मशीनची लिलावाने/निविदेने विक्री करावयाची आहे. सदर निर्लेखनयोग्य फर्निचर व २ झेरॉक्स मशीन्सचे एकूण पुस्तकी मुल्य रु. २,५५,१२१/- इतके आहे. त्यास मा. ग्रंथालय संचालकांची अनुक्रमे जा. क्र. ५५/फर्निचर निर्लेखन/२०१८-१९/९६६० दि. २४/०९/२०१८ व जा. क्र. ५५/निर्लेखन/ २०१८-१९/११०४० दि. ०६/१०/२०१८ पत्रान्वये मान्यता मिळाली आहे. सदरचे निर्लेखित साहित्य मुंबईच्या फोर्ट व ठाणे अशा दोन ठिकाणी विखुरलेले आहे. त्याचा तपशील सोबत जोडण्यात आला आहे. सदर निकामी वस्तूंसाठी दर हे एकदम द्यावयाचे आहेत. ज्या पक्षकारांना/संस्थांना सदर साहित्य खरेदी करावयाचे आहे, त्यांना सदरहु ठिकाणी दि. ०१/०१/२०१९ ते दि. १०/०१/२०१९ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते सायं. ५ या वेळेत पाहता येईल.

जास्तीत जास्त लिलावाचा/निविदेचा देकार (दर) देणाऱ्यास सामान (वस्तू) देण्यात येतील. संबंधितांनी दर मंजूर केल्यानंतर लिलावाची रक्कम आगाऊ रोख / धनाकर्ष स्वरुपात पाच दिवसाच्या आत भरुन निर्लेखित सामान स्वखर्चाने घेऊन जाणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांचे दर रद्द करुन निर्लेखित सामानाची विक्री अन्य संस्थेस/व्यक्तीस करण्याचे अधिकार हे कार्यालय राखुन ठेवीत आहे. तसेच, सदर संस्थेची/ व्यक्तीची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. कोणतेही दर मंजूर वा रद्द करणे तसेच लिलावाची/ निविदेची कार्यवाही कोणत्याही स्तरावर थांबविणे/ रद्द करणे, हे कार्यालयाचे हक्क अबाधित राहतील. तसेच, याबाबत कोणतीही कारणमीमांसा केली जाणार नाही.

ज्यांना लिलावाच्या खालील प्रमाणे नमुद केलेल्या अटी व शर्ती मंजूर असतील, अशा व्यक्तींनी/ संस्थांनी लिलावात सहभागी व्हावे. निर्लेखनयोग्य साहित्य दोन वेगवेगळया ठिकाणी असल्याने त्याबाबतचा लिलाव **राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, नगर भवन, फोर्ट, मुंबई येथे शुक्रवार, दि. ११/०१/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता व वर्तक नगर (ठाणे) येथे दुपारी ४.०० वाजता होईल. सहभागी व्यक्तींनी/संस्थांनी विहित वेळेत उपस्थित रहावे. पुढे नमूद केलेल्या अटी व शर्ती यांचे अधिन राहून लिलावास/निविदेस मंजूरी देण्यात येईल.**

## "अटी व शर्ती"

१) ज्या व्यक्तीस / संस्थेस लिलावात भाग घ्यावयाचा आहे. त्यांनी रु. २,५००/- रकमेचा धनाकर्ष "LIBRARIAN, STATE CENTRAL LIBRARY, MUMBAI" यांच्या नावे लिलावाच्या दिवशी कार्यालयात जमा करावा. अयशस्वी बोलीदारांचे/निविदाकारांचे धनाकर्ष त्याच दिवशी लिलाव संपल्यावर परत करण्यात येतील.

२) ज्या व्यक्तीचा/ संस्थेचा देकार मंजूर करण्यात येईल. अशा व्यक्तीनी /संस्थांनी निकामी सामान कार्यालयाच्या आवारात व आवारातून बाहेर नेताना वाहतूकीचा, हमालीचा व सामान हाताळणीचा खर्च स्वत: करावयाचा आहे.

३) निकामी सामान कार्यालयीन इमारत/आवारातून बाहेर नेतांना कार्यालयीन कामकाजात कोणताही अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

४) निकामी सामान कार्यालयीन इमारत/आवारातून बाहेर नेतांना कार्यालयीन वस्तुंची मोडतोड झाल्यास त्याची नुकसान भरपाई रोखीच्या स्वरुपात त्याच ठिकाणी वसूल करण्यात येईल.

५) निकामी सामान जेथे व जसे आहे, त्या अवस्थेत घ्यावे लागेल.

६) निकामी सामान कार्यालयीन आवाराच्या बाहेर त्वरीत नेणे बंधनकारक राहील.

७) जुने निकामी सामान पहावयाचे झाल्यास दि. ०१/०१/२०१९ ते १०/०१/२०१९ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११ ते सायं. ५ या वेळेत पाहता येईल.

८) ज्या व्यक्तींच्या/संस्थेच्या लिलावाची बोली/निविदेचा दर सर्वात जास्त असेल अशा पक्षकाराने सर्वात जास्त रक्कम बोली केलेल्या एकूण रकमेच्या २५% रक्कम लिलाव संपल्यानंतर त्याच दिवशी रोखीने किंवा धनाकर्ष स्वरुपात कार्यालयात भरणा करणे बंधनकारक राहील.

९) लिलाव प्रक्रियेबाबतचे सर्वाधिकार खालील निम्नस्वाक्षरित यांचेकडे राहतील.

१०) सदर लिलावाची सूचना, अटी व शर्ती आणि साहित्याचा तपशील शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर देण्यात आला आहे.

सही/-

(शशिकांत काकड)

प्र. ग्रंथपाल (गट -अ)

तथा लिलाव समितीचे अध्यक्ष

सहपत्र - निर्लेखनयोग्य वस्तूंचा तपशील

प्रत - कार्यालयीन सूचना फलक